| MHAH080013362025 | **<u>आदेश नि.क्र. ०५ खाली</u>** |
|---|---|

**०१.** सदरचा दावा वादीने प्रतिवादी यांचे विरुध्द निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यात वादींनी प्रतिवादींविरुध्द तात्पुरत्या मनाई हुकूमाकरिता अर्ज निशाणी क्र. ५ दाखल केलेला आहे.

**०२.** अर्ज निशाणी क्र. ५ मध्ये वादींनी असे कथन केले आहे की, प्र.वादी नं. १ हा वादी याचा पुतण्या असुन प्र.वादीचे वडिल व वादी हे सख्खे भाऊ आहेत. वादी व प्र.वादी यांचे कुटुंब हिंदु एकत्र कुटुंब असतांना वादी यांनी प्र.वादी नं. १ यांचे नावावर दि.०३/०५/२००३ रोजी सदर दावा मिळकत गट नं. १९/१ दस्त क्र.१७८९/२००३ द्वारे खरेदी घेतली व गट नं.१९/२ क्षेत्र दस्त क्र. १७९०/२००३ द्वारे खरेदी घेतले होते. त्याचवेळी वादी नं. १ याचे नावावर देखील गट नं १९/४ मधील ०.२५ आर ख.०.०३ आर ही मिळकत दस्त क्र. १७८८/२००३ अन्वये खरेदी घेतली व त्याच बरोबर गट क्रमंक १९/५ मधील ०.४४ आर ख. ०.४ आर ही मिळकत दस्त क्रमांक १७८७/२००३ द्वारे खरेदी घेतली आहे व नं.१९/१ मधील सामाईक विहीर पाणी हिस्सा वरील जमिनीच्या क्षेत्राप्रमाणे लिहुन घेताना त्याच दिवशी वादी नं. २ याचे गट नं. १९/४ मधील ०.२२ आर ख. ०.०२ आर दस्त क्र. १७९३/२००३ तसेच गट नं. १९/२ मधील ०.२२ आर व ख. ०.०१ दस्त क्र. १७९१/२००३ खरेदी घेतलेले आहे व गट नं. १९/३ मधील ०.४७ आर ख. ०.०५ आर दस्त क्र. १७९२/२००३ नुसार खरेदी घेतले.

**०३.** अर्ज निशाणी क्र. ५ मध्ये वादींनी पुढे असे कथन केले आहे की, सदर संपुर्ण मिळकतीस गट नं. १९/१ मधील सामाईक विहीर पाणी हिस्सा खरेदी घेतलेला आहे. ह्या मिळकतीचे अगोदरचे मालक एकाच कुटुंबातील असल्याने त्यांनी

सामाईकरित्या संपुर्ण गट नं. १९ करीता गट नं. १९/१ मध्ये सामाईक विहीर खोदली होती व सदर विहीरीवरुनच गट नं. १९ चे हिस्से बागायत होत होते. खरेदी खतामध्ये त्याच गट नं.१९/१ मधील विहीरीचे पाणी हिश्याचा उल्लेख वादी व प्र.वादी नं. १ याचेकरीता केलेला आहे. त्यानंतर ७/१२ सदरी वादी व प्र. वादी यांच्या नोंदी झालेल्या गट नं.१९/१ ते १९/७ मध्ये वादी व प्र. वादीचे वडिल व प्र.वादी यांनी गट नं.१९/१ मधील सामाईक विहीरीपासुन गट नं. १९/६ पर्यंत (वादी नं. २ चे हिश्यांपर्यंत) सामाईक ३ " व्यासाची सुमारे ८०० फुट लांबीची सामाईक पाईपलाईन केले व त्याचे आधारे वादी व प्र.वादी यांचे शेती गट नं. १९/१ मधील सामाईक विहीरीतुन पाणी घेत होते. असे असतांना अलिकडे वादी व प्र.वादी कुटुंबाचे इतर एकत्रातील जमिनीवरुन वाद झाले याच्या रागातुन दि.०२/०६/२०२५ रोजी वादी व प्र.वादी यांची भांडणे झाली व त्यानंतर प्र.वादी नं. १ ने गट नं. १९ चे बांधावर खड्डा घेवुन सामाईक पाईपलाईन फोडुन टाकली व वादीचे क्षेत्रात पाणी जावु द्यायचे नाही म्हणुन सदर पाईपलाईन बंद बुच (झाकण) लावले, त्यामुळे वादीचे क्षेत्रास जाणारा पाणी पुरवठा बंद केला. याउलट प्र.वादी स्वतः मात्र त्याचे गट नं. १९/१ व मधील क्षेत्रास पाणी भरीत आहे. त्याबाबत वादी यांनी प्र.वादी यांस विचारणा केली असता प्र. वादींनी वादी यांना सदर विहीरीमधुन पाणी देण्यास व पाईपलाईन जोडुन पुर्ववत करुन देण्यास विरोध केला व तुम्ही जरी कोर्टातुन मनाई हुकुम आणला तरी आम्ही या विहीरी शेजारी दुसरी विहीर खोदुन तुमचे पाणी बंद करु व सामाईक विहीरीचे पाणी घालवु अशी धमकी दिली.

**०४.** अर्ज निशाणी क्र. ५ मध्ये वादींनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१ हा गावचा पोलिस पाटील असुन इतर प्रतिवादी देखील आडदांड व नंगट आहे म्हणुन या जोरावर प्र. वादी वादींना सामाईक विहीरतुन पाणी घेवु देण्यास मज्ञाव करतात व फोडलेली पाईपलाईन देखील जोडण्यास हरकत करतात तसेच दुसरी बेकायदेशीर विहीर सामाईक विहीरी लगत करुन सामाईक विहीरीचे पाणी बंद करण्याचे/घालवण्याची, संपुण टाकण्याची भाषा वापरत आहे. म्हणुन वादी यास प्र.वादी

नं. १ याने वादी नं. १ व २ याचा गट नं. १९/१ मधील सामाईक विहीरीतुन विहीर पाणी हिश्याप्रमाणे सामाईक पाईपलाईनद्वारे शेतीसाठी पाणी घेण्यास मज्जाव करु नये म्हणून तात्पुरता ताकिदचा मनाई हुकुम मिळणेसाठी अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. सदरचे दाव्याचा अंतीम निकाल होण्यास बराच कालावधी जाणार असुन दरम्यानचे काळात प्र.वादी यांनी वादीस सदरील विहीरीवरील पाणी घेऊ न दिल्यास वादींचे बागायत शेतीचे अतोनात नुकसान होणार आहे व वादींची शेत पडीत होणार आहे. वादीचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. वादीची प्रथमदर्शनी केस आहे. न्यायाचा तराजु वादीचे बाजुने आहे. अशाप्रकारचा मनाई हुकूम दिल्यास प्र.वादी यांचे काही एक नुकसान होत नाही परंतु याउलट अशाप्रकारचा मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कधीही व कशानेही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब वादीचा तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विंनती केली आहे.

**०५.** प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी अर्ज निशाणी क्र. ५ वर त्यांचे म्हणणे निशाणी क्रमांक २७ खाली दाखल केले असुन ते थोडक्यात असे आहे की, प्र. वादी नं. ३ व वादी हे एकमेकांचे सख्खे भाऊ असुन प्र. वादी नं. १ व २ हे प्र.वादी नं. ३ ची मुले आहेत. प्र. वादी नं. ४ विकास हा प्र.वादी नं. २ सुनिलचा मुलगा असुन प्र. वादी नं. ५ ऋषीकेश हा प्र. वादी नं. १ अनिलचा मुलगा आहे. मौजे पारेगाव खु।।, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील गट नं. १९ मध्ये १९/१ ते १९/७ असे पोट हिस्से आहेत. यापैकी गट नं. १९/१ ही मिळकत प्र. वादी नं. १ अनिल रावजी कांदळकर याने दि. ०३/०५/२००३ रोजी स्वतंत्र रित्या मच्छिंद्रनाथ बाबुराव चत्तर यांचेकडुन रक्कम रु. ८०,०००/– ऐवजी गट नं. १९/१ मधील सामाईक विहीर पाणी हिश्याप्रमाणे घेण्याचे मालकी हक्कासह खरेदी घेतली असुन प्र. वादी नं. १ याने गट नं. १९/२ मधील ०.२९ आर क्षेत्र रक्कम रु.४४,०००/– मोबदल्याऐवजी दि. ०३/०५/२००३ रोजी स्वतंत्र रित्या कलावतीबाई गवराम चत्तर हिचेकडुन गट नं. १९/१ मधील सामाईक विहीरीतील पाणी हिश्याप्रमाणे घेण्याचे हक्कासह खरेदी घेतली. तेव्हापासुन सदर मिळकती या प्र. वादी नं. १ अनिल याचे कुटुंबाचे स्वतंत्र मालकी हक्काने ताबे व

कब्जेवहिवाटीस होत्या व आहेत. त्याचप्रमाणे वादींनी गट नं. १९/४ ते १९/७ मधील क्षेत्र गट नं. १९/१ मधील विहीर पाणी हिश्याप्रमाणे घेण्याचे हक्कासह खरेदी घेतले. वादी व प्र. वादी कुटुंबाने केलेली खरेदीखते ही स्वतंत्र असुन एकत्र कुटुंबातील नाहीत. परंतु दि.०२/०६/२०२५ रोजी प्र. वादी कुटुंबाच्या मालकीच्या गट नं. १२१ मध्ये वादी नं. १ याने अतिक्रमण केले त्यावरुन त्यांचेत वाद झाले. वादी व प्र. वादी यांचेमध्ये गट नं. १९/१ मधील ज्याने त्याने खरेदी केलेल्या हिश्याबाबत कोणताही वाद नव्हता व नाही. गट नं. १९/१ मधील सामाईक विहीर ही गट नं. १९/१ च्या पुर्व दक्षिण कोपऱ्यात ओढ्यालगत असुन प्र. वादी नं. १ अनिल याने सदर विहीरीपासुन स्वखर्चाने गट नं. १९/१ च्या पश्चिमेकडील बांधापर्यंत ३ १/२ इंची पाईपलाईन केलेली आहे. गट नं. १९/१ च्या पुढे असलेल्या पश्चिमेकडील गट नं. १९ च्या इतर पोटहिश्यामध्ये पाईपलाईन अस्तीत्वात नाही. त्यामुळे वादी कथन करतात त्याप्रमाणे प्र. वादींनी त्यांची पाईपलाईन फोडन्याचा अथवा पाईपलाईन बंद बुच लावुन पाणी पुरवठा बंद करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. वादी हे प्र. वादींच्या स्वतंत्र मालकीच्या गट नं. १९/१ मधील विहीरपासुन ते गट नं. १९/१ च्या पश्चिम बांधापर्यंत असणाऱ्या पाईपलाईनला पुढे पाईप जोडुन त्यांचे मालकीच्या १९/६ पर्यंत पाणी नेऊ पाहत आहे. गट नं. १९/१ मधील पुर्व दक्षिण कोपऱ्यात असलेल्या सामाईक विहीरीतुन वादींनी पाणी घेण्यास अथवा वापरण्यास प्र. वादींची कोणतीही हरकत नाही. परंतु वादींनी सदर सामाईक विहीरीपासुन त्यांचे मालकीच्या गट नं.१९/४ ते १९/६ पर्यंत स्वखर्चाने स्वतंत्र पाईपलाईन करुन पाणी न्यावे. वादींनी सदरचा खोट्या आशयाचा व खोट्या मजकुराचा दावा दाखल करुन प्र. वादींच्या मालकीची स्वतंत्र पाईपलाईन ही सामाईक असल्याचा कांगावा करुन वादी ती पाईपलाईन वापरु पाहत आहे. प्र.वादीच्या मालकीच्या पाईपलाईनला पुढे पाईप जोडुन त्यांचे क्षेत्रात स्वतंत्र पाईपलाईन न करता पाणी नेऊ पाहत आहे. वादींचा गट नं. १९/१ मध्ये केवळ सामाईक विहीरीतील पाण्यात हिस्सा आहे, त्यांना पाणी वापरण्याचा हक्क आहे. परंतु वादींचा विहीर अथवा विहीरीच्या जागेत हिस्सा व हक्क नाही. वादी हे जाणीपुर्वक प्र. वादींना त्रास देवुन विहीरीभोवतालची प्र.

वादीच्या मालकीची तीन ते चार गुंठे जागा पडीत ठेवायला लावतात. त्यामुळे प्र. वादींचे कशानेही न भरुन येणारे अपरिमीत असे नुकसान होत आहे. केवळ इतरत्र असलेल्या जमिनीतील अतिक्रमणावरुन वादी व प्र.वादी यांचेतील झालेल्या वादाचा सुड उगवायचा म्हणुन वादींनी प्र. वादींविरुध्द सदरचा खोट्या आशयाचा व खोट्या मजकुराचा अर्ज दाखल केला आहे. वरील सर्व कारणांस्तव वादींचा तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**०६.** वादी व प्रतिवादींच्या वकिलांनी केलेला युक्तीवाद ऐकला. दाव्यात दाखल केलेली कागदपत्रे पाहिली. वरील परिस्थितीत माझ्यासमोर खालील प्रश्न उपस्थित होतात. त्या प्रश्नांचा कारणांसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने आपले म्हणणे सकृतदर्शनी (Prima-facie case ) सिध्द केले आहे काय ? | ... होकारार्थी. |
| २ | न्यायाचे समतोलत्व (Balance of convenience) वादीचे बाजुने आहे काय ? | ... होकारार्थी. |
| ३ | तुर्तातुर्त मनाईचा आदेश न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान (irreparable loss) होणार आहे हे वादीने सिध्द केले आहे काय ? | ... होकारार्थी. |
| ४ | कोणता आदेश ? | अंतिम ओदशानुसार . |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>प्रश्न क्र. १ ते ४ करीताः–</u>**

**०७.** वादीने सदरील अर्जात असे कथन केले आहे की, वादीने त्याच्या अर्जात तो गट क्रमांक १९/४ चा मालक असून प्रतिवादी क्रमांक १ हा गट क्रमांक १९/१ चा मालक आहे. तसेच वादी क्रमांक २ हा गट क्रमांक १९/६ चा मालक असल्याचे कथन केले आहे. सदर बाबी प्रतिवादींना मान्य व कबुल आहेत. तसेच वादीने पुढे असे कथन केले आहे की, गट कमांक १९/१ मध्ये सामाईक विहिर असून त्या विहिरीचे पाणी पाईपलाईन वाटे घेण्याचा त्यास हक्क व अधिकार आहे. वादीला गट क्रमांक १९/१ मधील सामाईक विहिरीचे पाणी घेण्याचा हक्क व अधिकार असल्याची बाब देखील प्रतिवादींना मान्य व कबुल आहे. परंतु वादीने पुढे असे कथन केले आहे की, गट क्रमांक १९/१ मधील सामाईक विहिरीपासून गट क्रमांक १९/६ पर्यंत येणारी सामाईक पाईपलाईन प्रतिवादींनी दि.०२/०६/२०२५ रोजी बंद बुच लावून बंद केली असून वादीच्या गट क्रमांक १९/६ मध्ये होणारा पाणीपुरवठा बंद केला आहे. त्यामुळे वादीच्या शेतातील पीकांवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, गट क्रमांक १९/१ मधील विहिर सामाईकात असली तरी गट क्रमांक १९/१ मधील विहिरीपासून पुढे जाणारी पाईपलाईन ही सामाईकात नूसन ती प्रतिवादींनी स्वखर्चाने केलेली आहे. त्यामुळे त्या पाईपलाईनव्दारे पाणी घेण्याचा अधिकार वादींना नाही.

**०८.** वादी व प्रतिवादींचे एकदंरित कथन पाहिले असता गट क्रमांक १९/१ मध्ये सामाईक विहिर असून त्या विहिरीचे पाणी घेण्याचा अधिकार वादी व प्रतिवादी या दोघांनाही असल्याची बाब उभयपक्षांना मान्य व कबुल आहे. केवळ गट क्रमांक १९/१ मधील विहिरीपासून येणारी पाईपलाईन सामाईकात आहे अथवा ती प्रतिवादींच्या स्वतंत्र मालकी आहे याबाबत उभयपक्षांमध्ये वाद आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार सदर पाईपलाईन ही त्याची स्वतंत्र मालकीची आहे. परंतु सदर बाब प्रथमदर्शनी सिद्ध

करण्याकरीता प्रतिवादींमार्फत कोणताही प्रथमदर्शनी कागदोपत्री पुरावा प्रस्तुत करण्यात आलेला नाही. महत्वाची बाब म्हणजे वादी व प्रतिवादी यांनी सदर दाव्यात नमूद केलेलया सर्व मिळकती ह्या एकाच कुटुंबाकडून एकाच वर्षी म्हणजेच सन २००३ मध्ये खरेदी केल्याची तसेच त्या कुटूंबाची गट क्रमांक १९/१ मधील विहीर सामाईकात होती ही बाब उभयपक्षांना मान्य आहे. अशा परिस्थितीत वादातीत पाईपलाईन ही देखील सामाईकात होती हे प्रथम दर्शनी दिसून येते. प्रतिवादींमार्फत वादातीत पाईपलाईन त्यांची स्वतंत्र मालकीची असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा प्रस्तुत करण्यात आलेला नसल्यामुळे वादींनी केलेल्या कथनात प्रथमदर्शनी तथ्य आढळते. वादींनी त्यांचे कथन सिध्द करण्याकरीता प्रस्तुत केलेली कागदपत्रे म्हणजेच त्यांच्या कथनात नमूद केलेल्या मिळकतींची खरेदीखते तसेच पाईपलाईन बंद केल्याबाबत दाखल केलेली छायाचित्रे पाहिली असता वादींनी केलेले कथन प्रथमदर्शनी संयुक्तीक वाटते. म्हणुन अभिलेखावर प्रस्तुत कागदोपत्री पुराव्याचा विचार करता मी या निष्कर्षास येतो की, वादींनी त्यांचे कथन प्रथमदर्शनी शाबीत केले असून न्यायाचा तराजू देखील त्यांच्या बाजुने झुकलेला दिसतो. अशा परिस्थितीत, वादींच्या हक्कात तसेच प्रतिवादींविरुद्ध तात्पुरता मनाई हुकूम पारीत न केल्यास वादींच्या पिकांचे नुकसान होईल व सदर नुकसान हे कधीही भरुन न निघणारे ठरेल. याकरीता वादीच्या हक्कात व प्रतिवादींविरुध्द वादीने केलेल्या मागणी प्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम पारीत करणे न्यायोचीत ठरेल. म्हणून, वरील सर्व बाबी लक्षात घेता वादीच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकूम पारीत करणे मी योग्य व संयुक्तीक समजतो. म्हणून, मी प्रश्न क्र. १ ते ३ चे उत्तर **होकारार्थी** देत असुन प्रश्न क्र. ४ साठी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादींचा अर्ज नि.क्र. ०५ मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादींविरुध्द असा तात्पुरता मनाई हुकूम पारीत करण्यात येतो की, सदर दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादींनी स्वतः अगर त्यांचे वतीने त्यांचे

नोकर, चाकर, गडी, माणसे, एजंट यांचे मार्फत वादींना गट नं. १९/१ मधील सामाईक विहिरीपासून वादींच्या गट क्रमांक १९/६ पर्यंत जाणा–या सामाईक पाईपलाईन मार्फत विहीर पाणी हिश्याप्रमाणे शेतीसाठी पाणी घेण्यास व सामाईक पाईपलाईन वापरण्यास व जोडण्यास हरकत अडथळा करु नये.

JOSHI PRASAD BALKRISHNA

Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA
Date: 2026.01.22 17:31:10 +0530

ठिकाण : संगमनेर.

दिनांक : २२.०१.२०२६.

**( प्रसाद बा. जोशी )**

५ वे दिवाणी न्यायाधिश, व. स्तर, संगमनेर.